**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAR-APR, 2022, VOL- 9/*

# एकत्र कूटूंब पध्दती : आजच्या काळाची गरज

प्रा. जीवन खुशालराव शिंदे,
सौ. मंजुळाबाई कॉलेज खतगांव ता.बिलोली जि. नांदेड.

**Paper Received On:** 25 APR 2022

**Peer Reviewed On:** 30 APR 2022

**Published On:** 1 MAY 2022

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

समाजात मानवाने सुखी, समाधानासाठी समाजशिल प्राणी बनविण्यासाठी कुटूंबाची निर्मिती केली. त्यात स्त्री व पुरूष ही दोन भिन्न लिंगी व्यक्ती कूटूंबरूपी दोन चाके मानली गेली. एकत्र कुटूंब पध्दती समाजासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरू लागली. परंतु काळाच्या ओघात तीचे विघटन होवू लागले त्यातून संस्कृती नष्ट होवू लागली. वृध्दांच्या समस्या वाढू लागल्या. कुटूंबात एकाकीपणा सोसेन असा झाला. संस्काराचे नामोनिशान होऊ लागले. त्याचा परिणाम घटस्फोट आणि मुलांच्या मनावर होऊ लागला म्हणून एकत्र कुटूंब पध्दती संस्कार देण्यासाठी व समाज टिकविण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळेच ती एक आजच्या काळाची गरज बनली आहे.

कुटूंब हा मानवी समाजाचा महत्त्वचा घटक आहे. कुटूंब हे संस्काराचे विद्यापीठ आहे ती एक समाजाची आधार शीला मानली जाते. तसेच समाज रचनेचा पाया सुध्दा आहे. कुंटूंबातूनच प्रत्येक माणसाचे जडण-घडण होवू शकते म्हणूनच कुंटूंब आणि माणसाच एक आगळ -वेगळ नातं आहे. कुंटूंब म्हणजे घर असून त्याचे दोन प्रकार पडतात. एक विभक्त कुंटूंब तर दुसरे संयुक्त कुटूंब त्यालाच एकत्र कुंटूंब असे म्हणतात.

एकत्र कुटूंबात एका पेक्षा जास्त पिडीचे लोक असतात त्यामध्ये काका-काकू, चुलत भाऊ-बहिण, आजी-आजोबा, आई-वडील इत्यादी ते सर्वजन गुण्यागोविंदाने राहतात. मुलांच्या वाढत्या वयात संस्कार ही एक महत्त्वाची बाब आहे ती कुटूंबातून मिळतांना दिसते. बालकांच्या शंकाचे निराकरण एकत्र कुटूंबातील जेष्ठ व्यक्तीकडून होत असते. सध्या मात्र शिक्षणामुळे शहरीकरणामुळे विभक्त कुटूंब पध्दती फार मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आल्याचे दिसते पण लहान मुलांच्या भावनांचा निचरा होण्यास फार मोठी अडचण येत आहे. खूप वेळ आणि बंधने येत आहेत. किशोर वयीन मुलांच्या भावनिक विकासात बांधा येत आहे. त्यासाठी पालकांची महत्त्वाची भूमिका असते. ही सर्व कार्य एकत्र कुटूंबातूनच पाहायला मिळत. त्यातून मुलांचा शारिरीक, मानसिक व भावनिक विकास होत असतो. परंतु सध्याच्या काळात एकत्र कुटूंब पध्दती हळू-हळू लोप पावत चालली आहे म्हणून हा विषय संशोधनासाठी ठेवावा असा वाटला.

संत ज्ञानेश्वराने पसायदानात म्हटले आहे की, "हे विश्वच माझे घर" म्हणजे विश्वाला एक कुंटूंब मानलेले आहे पण काळानुसार कुंटूबाची संकल्पना व व्याख्या बदलत गेली. एकत्र कुंटूंबातून विभक्त कुंटूंब पध्दती निर्माण झाली अशा कुंटूंबात प्रत्येक सदस्यांची अपूलकी व काळजी घेणे व कमी होत गेले. जेंव्हा एखादी नैसर्गिक किंवा मानव निर्मित अपत्ती कोसळते तेंव्हा वसुंधरे वरील इतर कुंटूंब सदस्यांनी केलेली मदत म्हणजे रक्ताच्या नात्या पलीकडचे ही प्रेम आणि माया होय. हीच माया कुंटूंबाला जिद्दने व ताट मानेने जगायला शिकविते.

भारतात ब्रिटिशांचे जेंव्हा आगमन झाले. तेंव्हा औद्योगिकरणाचे वारे वाहत होते. त्यातून एकत्र कुंटूंब पध्दतीला हादरा बसत होता. खेड्यातील लोक पोटा पाण्यासाठी शहरात धाव घेत होते. त्यामुळे एकत्र कुंटूंबाची शक्यता मावळत गेली. शिवाय ग्रामीण भागातील जुने माणसांना शहरात जावून जगणे कठीण होऊन बसले होते. त्यांच्या पुढे विविध प्रश्न निर्माण होत होते. शिक्षणामुळे स्त्रीयांच्या जीवनात क्रांती घडत गेली. स्त्रीया या स्वत:च्या पायावर उभ्या

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

राहू लागल्या व स्वत: घराची आणि कुंटूंबाची स्वप्ने पाहू लागल्या होत्या त्यातूनच आजच्या युगात विभक्त कुंटूंब पध्दती उदयास आली आणि एकत्र कुंटूंब पध्दती नष्ट होत गेली. त्यातूनच आपण काय कमावल आणि काय गमावलो. याचा विचार करणे संयुक्तीक ठरले.

एकत्र कुंटूंबात काही कार्यक्रम होत असतील त्यात जन्म, मृत्यू, लग्न सोहळा इत्यादी तर अशा प्रसंगी कुंटूंबाचे योगदान फार जास्त दिसते. सर्व सोहळे आनंदाने साजरे होता अशा कुंटूंबात एकमेकांना फार मोठा आधार मिळतो. एवढेच नसून दु:खद प्रसंगी एकमेकांना सांभाळून घेण्याचे तऱ्हाच न्यारी असते. ही परंपरा कायम टिकली तर येथेच स्वर्ग दिसेल तसेच घरातले स्त्री कामानिमित्त बाहेर गेले असता. अशा कुंटूंबात लहान मुलांचा सांभाळ करणारे व संस्कार लावणारे वृध्द व्यक्तीच असतात.

जगामध्ये खूप पुरातन संस्कृती नावाजलेली होती त्यात भारतीय संस्कृतीचा वरचष्मा होता. इतिहासात झ ालेल्या अनेक घटना घडामोडीमुळे एकत्र कुंटूंब पध्दतीला खूप महत्त्व होते पण ते कुंटूंब आज काळाच्या ओघात वाहत गेले आणि आपल्या देशातील कुंटूंब व्यवस्था व संस्कृती लयास गेली. म्हणून भारताने एकत्र कुंटूंबाला अधिकाधिक महत्त्वाचे मानले.

एकत्र कुंटूंबाचे कार्य :-

१) एकत्र कुंटूंब पध्दती लहान मुलांना संस्कार लावण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते कारण लहान मुलांचा पहिला मित्र आजी-आजोबा असतात तर आजी-अजोबांचा शेवटचा मित्र त्या कुंटूंबातले लहान मुले म्हणजेच नातवंडे असतात. त्यांच्या संवादातून आपोआपच संस्कार घडतात.

२) एकत्र कुंटूंब पध्दती पावलो पावली कौटुंबिक सदस्यांना स्वालंबि बनविण्यासाठी मार्गदर्शन करीत असते. त्यामुळे व्यक्ती हा परावलंबी न राहता स्वत:च्या पायावर उभा राहतो आणि जीवनातील अनेक निर्णय स्वत:च घेतो म्हणजेच स्वालंबनासाठी कुंटूंबाचे महत्त्वाचे योगदान आहे.

३) कोणताही व्यक्ती जन्मत: हाडा मांसाचा एक गोळा असतो. त्या गोळयाला कुंटूंब सदस्य संस्काराचा आकार देवून त्याचे समाजशील प्राण्यात रूपांतर करतात. त्यामुळे माणूस समाजशील बनत असतो. याचा अर्थ माणसाचे सामाजिकरण कुंटूंबातून होत असते.

४) कुंटूंब हा समाजरचनेचा पाया असतो. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत शिक्षण देणारी शाळा असते. त्यातूनच वंश उत्पत्ती निर्माण होते आणि समाज टिकवून राहतो.

अशा प्रकारे कुंटूंब हे माणसाला आधार देण्यासाठी धैर्यवान, नीतीवान, गुणवान बनविण्यासाठी सतत प्रयत्न करीत असते. त्यामुळे आजच्या काळात विभक्त पेक्षा एकत्र कुंटूंबाची नितांत गरज भासते.

एकत्र कुटूब म्हणजे नैसर्गिक मानसोपचाराचे एक चालते बोलते समुपदेशन केंद्रच होय. दु:खद प्रसंगी एकमेकाना सांळाळून घेणारे औषधच आहे. व्यक्तिच्या विकासाला चालना देणारे एक महत्त्वाचे प्रेरणास्त्रोत आहे. पण आज ही कुंटूंब व्यवस्था कोलमडून पडत असल्यामुळे इतर देशातल्या सारखे घटस्फोटाचे प्रमाण भारतात फार मोठ्या प्रमाणात वाढत चालले आहे. मुंबई कुंटूंब न्यायालयामध्ये दररोज सरासरी १० घटस्फोटोच अर्ज दाखल होतात. याचा अर्थ अमेरिकेसारख्या संस्कृतीचे लोन भारतात पसरत चाललेले आहे. आपल्या मुलांच्या भवितव्याला आकार देणे अवघड होत चाललेले आहे. छोटया कुटूंबात तर पती-पत्नीत वाद निर्माण होत आहेत. त्यांना सांगणारे व शिकविणारे कोणीही दिसत नाही म्हणून एकत्र कुटूंबाची आज गरज आहे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

"कुटूंबापेक्षा मोठ कोणतही धन नाही.

वडिलांशिवाय कुंटूंबाला मान नाही.

आजी शिवाय कुंटूंब अधूरं असते.

आजोबाशिवाय स्वप्न दूर दिसते.

सारांश :-

अशा प्रकारे कुंटूंब संस्था मानवी जीवनाला आकार देवून माणूस घडविणारी शाळा असते. तेथे पहिला गुरू आई असते त्याच बरोबर कुंटूंबातले काका-काकू, आजी-आजोबा हे सर्वजण जीवन शिक्षण देत असतात असे कुटूंब आदर्श दिसतात. छोटे कुटूंब छोट्या संकटानेही कोलमडून पडतात पण मोठे कोणत्याही संकटाला तोंड देतात त्याच बरोबर मोठे कुंटूंब परिपूर्ण बनवितात त्या कुटूंबातले व्यक्ती प्रेमळ असतात म्हणूनच कुटूंबावर जिवापाड प्रेम करतात. त्यामुळे एकत्र कुटूंब पध्दती टिकून राहणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे.

संदर्भ ग्रंथ :-

| | | |
|---|---|---|
| भारतीय समाजशास्त्र | - | के.जी. पाटील |
| भारतीय समाज | - | भा.की. खडसे |
| सामाजिक संस्था | - | श्री शिरगावे |
| ग्रामीण समाजशास्त्र | - | श्री अत्रे व कुलकर्णी |

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*